Vol 5 Issue 12 September 2016 ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

Ashok Yakkaldevi
A R Burla College, India

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Dr. T. Manichander

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.1402(UIF) Volume - 5 | Issue - 12 | September - 2016

Review Of Research

# संतांचे समातावादी विचार

प्रा. संतोष खंडारे
समाजशास्त्र विभाग , श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कारंजा जि. वाशिम.

**सारांश :–**

भारत ही संतांच्या चरणस्पर्शाने पावन झालेली भूमी आहे. संतांच्या वाणीतून आणि कृतीतून लोककल्याण साधल्या गेले. म्हणून असे म्हणतात. 'जगाच्या कल्याणा । संतांच्या विभूती । देह कष्टविती । परोपकारे । याचाच अर्थ संतांनी आपले संपूर्ण आयुष्य आपली वाणी आणि देह परोपकारासाठीच झिजविला. डॉ. अरुणा ढेरे लिहीतात – संतांच्या साहित्यामागे समानतेची, करुणेची भावना पोहोचण्याची उत्कट प्रेरणा होती. हे खरे आहे. संत समतावादी होते, मानवतावादी होते. त्यामुळे मानवाला मनाची शुध्दता लाभली, आचरण शुध्द, चोख असले तर स्पृश्य –अस्पृश्यता नष्ट होईल. हा संतांचा आशावाद होता. त्याकाळी प्रखर वर्णव्यवस्था होती. धर्माचे वर्चस्व होते. समाज चातुर्वर्ण्यावर आधारलेला होता. कर्मकांडाचे प्रभुत्व असलेला जातीभेदाने विभागलेला समाज होता. श्रेष्ठ–कनिष्ठतेची भावना समाजात होती. स्त्रियांचे जीवन हालाखीचे होते. स्वार्थ, मत्सर, हेवेदावे, प्रतिष्ठेच्या खोटया कल्पना, दंभ अहंकार या मानवी प्रवृत्ती उसळून आल्या म्हणजे परस्परांमध्ये तेढ निर्माण होते या पार्श्वभूमीवर जनसामान्याला समजेल अशा लोकभाषेतून ख–या अध्यात्मज्ञानाची मांडणी आणि प्रसार करण्याची गरज ओळखून संत मंडळींनी भारतात प्रबोधनाचे फार मोठे कार्य केले. भारताच्या सांस्कृतिक इतिहासाच्या अभ्यासात मध्ययुगातील संतांच्या कार्याचे महत्व अधिक आहे. व्यक्ती आणि समाजात एकजिनसी नाते संतांनी निर्माण केले संतांची सामाजिक जाणिव ही तळागाळातील माणसांच्या मनातील हुंकार आहे.. जाती, धर्म कर्मकांडाच्या सामाजिक अपप्रवृत्तीचा प्रतिवाद करण्यासाठी संतांनी धर्माचरणाची नवी आचारसंहिता रूढ करण्यासाठी केलेल्या विविध प्रयत्नांचा परामर्श घेण्यात आला. म्हणुन संतांच्या समतावादी, मानवतावादी विचारांचे दर्शन घडविण्याच्या हेतूने काही निवडक संतांच्या विचारातील समतेचे तत्व हा प्रस्तुत अध्ययनाचा विषय असून



**प्रस्तावना :–**

भारत हे जगाला मानवतेची शिकवण देणारे व विश्वबंधुत्व रूजविणारे एक राष्ट्र आहे. माणसाला माणूस मानणे हीच खरी देवपूजा आहे. ही मानवतावादी, समतावादी शिकवण संतानी दिली. सर्वच संतांनी सामाजिक जाणिवेतून सामान्य माणसाचे दुःख जाणले व समाजाला आधात्मिक उन्नतीबरोबरच सामाजिक उन्नतीचा, जातीभेदाचे निर्मूलन करुन सामाजिक मर्यादा लक्षात घेवून जिव्हाळयाने, तळमळीने कार्य केले. सामाजिक विषमतेमुळे उच्चवर्णीयांच्या अन्याय, अत्याचार शोषण इ. ला ज्याकाळी समाजाला बळी पडावे लागत होते. माणसापेक्षा धर्माचे प्राबल्य होते अशा परिस्थितीत सामाजिक परिवर्तन व्हावे. उपेक्षित लोकांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देता यावी हया करीता सर्व संप्रदायातील संतांनी प्रयत्न केलेत. माणसांच्या शोषणाला तात्कालीन समाजव्यवस्था कारणीभूत होती, या समाज व्यवस्थेवर धर्माचे वर्चस्व होते. म्हणून संत सांगत असत की धर्मात व्यक्ती आणि समाजाच्या नैतिक. सामाजिक, राष्ट्रीय इ. सर्व बाबीच्या समावेश होतो. समाजाला जागृत करण्याचे कार्य संतांनी केले. एकोणिसाव्या शतकात समता ही संकल्पना जगभरात संर्पण विचारवंतांना विचार करण्याला लावणारी सर्वात प्रभावशाली संकल्पना होती. यासंदर्भात काहींनी माणसा माणसाला सारखेपणा तर काहिंनी माणसात असलेली अनेक बाबतीत भिन्नता असली तरी प्रत्येकाशी समान व्यवहार हा झालाच पाहिजे अशी भूमिका मांडली.

जगातील सर्व माणसे जन्माने सारखी असली तरी प्रत्यक्ष व्यवहारात माणसामाणसांमध्ये लिंगभेद, जातीभेद, आचारविचारावर आधारीत भेद इ. बाबतीत विषमता असते. तिच्यावर मात करून सर्व माणसांना समान संधी आणि अधिकार आहेत. असे मानने म्हणजे समता म्हणता येईल. ज्या देशात विविधता आहे म्हणजे जात, वंश, धर्म, लिंग, संतती यांच्यात वेगळेवेगळेपणा असतो अशा परीस्थितीत माणसामाणसांमध्ये कोणत्याही कारणाने भेद केला जात नाही. सर्वांना जीवन जगण्याचा आचारविचारांचा अधिकार दिला जातो. अशा समाजाला समजाधिष्ठीत समाज म्हणता येईल. समताधिष्ठीत समाज आपोआप निर्माण होत नसतो. त्याकरीता जाणिवपूर्वक प्रयत्न व्हायला हवे. समाजातील सकारात्मक सामाजिक मानसिकता निर्माण होण्याकरीता संतांच्या विचारांची, शिकवणीची गरज भासते.

संतांच्या कार्याचे मूल्यमापन करतांना अनेक समिक्षक विदधवांनामध्ये मतमतांतरे आढळुन येतात.

संतांच्या वाणीत धर्म, तत्वज्ञान, कवित्व आणि साहित्य या सा-याची एकभूस आढळते. संत कवीचा उदय प्रथम दक्षिण भारतातील तामीळनाडूमध्ये

झाल्याचे आढळते. इ. स. 4 थे ते 8 वे शतक हा आळवार वैष्णव संतांचा काळ त्यानंतर 11 वे शतक रामानुजन, 14 ते 16 वे शतक कबीर मीराबाई तुळशिदास, रोहीदास, वल्लभाचार्य इ. चा काळ 13 वे ते 17 व्या शतकापर्यंत महाराष्ट्रामध्ये अनेक संप्रदाय उदयाला आलेत.

### *उद्दिष्टये :–*

1) संतांच्या समतेविषयी विचारांचा अभ्यास करणे.
2) संतांच्या कार्याचा अभ्यास करणे.

### *गृहितके :–*

1) संतांचे विचार हे समाज परीवर्तनाचे माध्यम आहे.
2) संतांच्या सामाजिक कामगिरीची समाजाची सांस्कृतिक जडणघडण होण्यास प्रेरणादायी आहे.

### *व्याप्ती :–*

स्तांनी मानवी जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक,इ. विविध पैलुविषयक विचार मांडलेले आहेत. तसेच त्यासंदर्भात कार्य सुध्दा केलेले आहे. यातील त्यांचे समतेसंदर्भातील कार्य संबंधित आहे.

### *विषय विवेचन :–*

***वैष्णव संतांचा काळ –*** इ.स. 4 थे ते 8 व्या शतकात आळवार नामक बारा संतांचा उदय झाला. या आळवार संतांच्या विचारप्रणालीत जातीभेद, वर्णभेद, स्त्री–पुरुष भेद दिसत नाही. पारमार्थिक व अध्यात्मिक क्षेत्रात समतेचे तत्व स्विकारलेले दिसते. कारण या आळवारपैकी आंडाळ ही स्त्री संत होती. तसेच काही शुद्रासारख्या कनिष्ठ जातीतील संत होते. ईश्वर सर्वव्यापी असून माणसाचे शरीर हे त्याचे पवित्र मंदीर आहे असे समजून आपण ईश्वराची अंतःकरणापासून भक्ती करावी असे वैष्णव संप्रदायातील संतांची शिकवण होती.

***रामानुजाचार्य :–*** इ. स. 11 व्या शतकातील रामानुजाचार्य यांनी आळवार संतांना आपल्या गुरुस्थानी मानुन आपले कार्य पुढे चालविले. रामानुजाचार्यांनी आपल्या तीर्थयात्रा पूर्ण केल्यानंतर कांचीपूर्णस्वामी नावाच्या अत्यंज (अस्पृश्य) संत पुरुषापासून दीक्षा मिळाल्यानंतर संन्यासधर्म स्विकारला. वैष्णव संप्रदायात जातीभेद नव्हता व एखाद्या अस्पृश्य आपल्या साधनेच्या व आध्यात्मिक प्रगतीच्या साहाय्याने संत पुरुष, गुरु होवु शकत होता. रामानुजांनी एका राजाच्या साहायाने मेलकोटे येंथे नारायणाचे मंदिर बांधले व तेथे इतरांबरोबर अस्पृश्यांना मंदिरात मुक्त प्रवेश ठेवला. त्यांच्या अनुयायांचे दोन पंथ होते. त्याजील टेंकलाई पंथ शुद्र अतिशुद्रांसारख्या कनिष्ठ व अस्पृश्यांना भक्ती मार्गाचे दार खुले करण्याचा प्रयत्न करीत होते यावरुन सामाजिक समतेचे तत्व या संप्रदायात जाणवते.

***स्वामी रामानंद*** – इ. स. 15 वे शतक

जातीपांती पूच्छे नही कोई। हरीको भजे सो हरिका होई ।।

वरील वचनातून स्वामी रामानंद यांची सामाजिक भूमिका व्यक्त होते. त्यांच्यामते जात पात ही विचारात घेण्याजोगी गोष्ट नाही. जो हरीला भजतो तो हरीचा होईन जातो. यांच्या संप्रदायात चांभार, विणकर, जाट शेतकरी, न्हावी, राजपूत स्त्रीया अशा विविध जातीच्या शिष्यांना समावेश होता. ईश्वराच्या दृष्टीने सर्व माणसे समान आहेत. हे तत्व समानंदांच्या विचारात होते. एक माणूस दुस–यापेक्षा श्रेष्ठ असू शकतो तो जन्माने नव्हे तर त्याच्यातील मानवाविषयीचे प्रेम आणि सहानुभूतीमुळेच. सर्व मानव जात म्हणजे एक कुटुंब आहे. याची त्यांना जाणीव झाली होती.म्हणजे त्यांनी हिन्दी भाषेच्या माध्यमाने सामाजिक समतेचा संदेश समाजातील सर्वसामान्य लोकांपर्यत पोहचविला.

संत कबीर – 15 वे शतक – कबीर स्वामी समानंदाचे शिष्य होते. कबीर पूर्वतः समतावादी होते. सर्व प्रकारचे जातीभेद त्यांनी नाकारले होते.'एक बिंदूसे विश्व रचा है, को ब्राम्हण को शुद्र।' असा प्रश्न विचारुन त्यांनी ब्राम्हण व ब्रम्हणेतरातल्या श्रेष्ठ–कनिष्ठतेतल्या पारंपारिक समजूतींना छेद दिला. कबीरांच्या काळात धर्माधर्मामध्ये झगडे चालत असत लोक आपल्याच धर्माला कनिष्ठ मानुन दुस–या धर्माविषयी देष बाळगत होते. संत कबीर यांनी सत्यालाच ईश्वर मानले होते. कोणाशीही वाद न घालता समाजात सर्वानी नैतिक नियमांचे व सदाचरणाचे पालन करावे याकडे लोकांचे लक्ष वेधले.

जाती न पुछो साधुकी, पुछी लिजीए ज्ञान
मोन करो तलवार का पडी रहन दो म्यान ।।

म्यानाला महत्व नाही तलवारीला मूल्य आहे. तसे साधुची जात महत्वाची नाही त्याचे ज्ञान मोलाचे आहे. असा संदेश देउन त्यांनी जाती निरपेक्ष मुल्यभावाची मांडणी करणारा विचार मांडला. तसेच कर्मकांडावर सुध्दा टिका केलेली दिसते. तसेच हिन्दू–मुस्लिम ऐक्याचा संदेश दिला. राम–रहिम एक आहेत असा समन्वय विचार घेऊन धर्म प्रबोधनातल्या समतेचा आशय संत कबीरांनी रूजविला.

### *वारकरी संप्रदाय*

महाराष्ट्रात इ.स. 13 व्या शतकाच्या अखेरीस संत चळवळीस सुरुवात झाली. अनेक संप्रदाय उदयास आलेत. त्यापैकी वारकरी हा एक संप्रदाय आहे. वारकरी संप्रदाय आहे. वारकरी संप्रदाय अद्वैतवादी आहे. या पंथाने परमेश्वराला देवळातून बाहेर माणसात आणले. या संप्रदायाने समतावादाचा पुरस्कार केला. संत ज्ञोनश्वरांनी गीतेतल्या लोकोध्दारक विचारांना संस्कृतभाषेतून मराठी भाषेच्या माध्यमातून सर्वसामान्यापर्यत पोहोचविले आणि आत्मोन्नतीचा मार्ग सर्वांना खुला करुन दिला. समाजातील लोकांचे दुःख, दैन्य, दारिद्रय, गुलामगिरी,

अज्ञान अंधश्रध्दा, इ असामाजिक बाबींसंदर्भात संतांचे हृदय करुणेने हेलावले. अशा ह्या अंधकारमय दुःखात असणाऱ्या लोकांना तारुण नेण्यासाठी संताच्या मनात करुणा निर्माण झाली. यातून बाहेर काढण्यासाठी ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम या व इतर संतांनी भक्तीचा मार्ग दाखविला तसेच विज्ञानवाद समाजाला शिकविला. भूतदयेची शिकवण दिली. केवळ माणसातच नव्हे तर प्राणीमात्रातही परमेश्वर आहे. सर्व सजीवांवर स्वतः इतकेच प्रेम करण्याची समाजभिमुखता संतांच्या शिकवणीतून दिसून येते. ज्ञानदेवांनी भागवत धर्माचा पाया नाथसंप्रदायातून रचला.

संतकृपा झाली। इमारत फळा आली ।।
ज्ञानदेवे रचिला पाय । उभारिले देवालया ।।
नामा तयाचा किंकार । तेणे रचिले ते आवार।।
जनार्धन एकनाथ । खांब दिल्हा भागवत ।।
तुका झालाये कळस। भजन करा सावकाश ।।

असे बहिणाबाई यांनी आपल्या अभंगात म्हटले आहे.

*संत एकनाथ :–* अभंग, भारुड आणि गौळणीद्वारे समाजप्रबोधन केले. त्यांना वाळवंटात तडफणाऱ्या गाडवाची तहान भागवणे ही देवपूजा वाटली. वडीलांच्या श्राध्दादिनी अस्पृश्यांच्या पंगती बसवल्या, दलितांच्या मुलाला कडेवर घेतले. हे सर्व कार्य सुधारणावादी व समतावादी विचारसरणीतून झाले.

*तुकाराम :–* तुकाराम महाराजांनी तपसाधना, चिंतन–मनन, ध्यान–सारणा यामाध्यमातून ईश्वराचे चिंतन केले. किर्तनातून त्यांचे अभंग प्रसारीत होऊ लागले, लोकांच्या मुदयाचा ठाव घेवू लागले. यामुळे सामान्य माणसाला तुकाराम आपलेले वाटू लागलेत. तुकारामाविषयी ल.श. नसिराबादकर म्हणतात. रंजल्या गांजल्यांना पोटाशी धरुन प्रेम आणि वात्सल्याचा उधळण करणारा, प्रसंगी कठोर आणि परखड बनून जीवनभाष्य करणारा जनात जनार्धन शोधून मानवतेचे द्वाहि फिरवणारा तुकाराम हा महाकवी होता.''

वरील संतांचे समाजसुधारणेचे कार्य पुढे नेणारे आधुनिक संत तुकडोजी महाराज व संत गाडगे बाबा हे दोन संत लोकोत्तर महापुरूष होऊन गेले.

### *निष्कर्ष*

1 संतांनी आपल्या साहित्यात स्वधर्मपालनाला महत्व दिले आहे.
2 संतांनी राज्यकर्त्यांनाही धर्माचरणाची लोकशाही पूल्याचीच कास धरली पाहिजे हया भूमिकेतून नैतिक राजकीय मूल्यांची पायाभरणी केली.
3 सर्व संतांनी समाज रक्षणावर भर दिला.
4 सर्व संत साहित्यात सदाचरणाबरोबर नीतीला महत्व देण्यात आले होते.
5 संतांनी समाजाची सांस्कृतिक पातळी उंचावण्याचे प्रयत्न केलेत.
6 संतांनी भेदाभेद न मानता समतेचा उपदेश केला.
7 संस्कृत भाषेतील बंदिस्त ज्ञान जनसामान्यांना मराठीत खुले करून सामाजिक समतेच्या वाटचालीत महत्वपूर्ण कार्य केले.

### *संदर्भ :–*

1. जोशी डॉ. चंद्रशेखर – दै. सकाळची प्रेरणा पुरवणी दि. 06/12/2007
2. ढेरे डॉ अरूणा – संत साहित्य प्रकाशक कुलसचिव यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक – 1992
3. मिरासे विनय – अशांत देहफुल – ज्ञान प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, 2010
4. दर्ज – त्रैमासिक – वेद मुद्रा प्रकाशन, अमरावती, एप्रिल – जुन – 2016
5. डॉ. अतकरे प्रकाश – विविधतेतील एकता, प्रकाशक. कुलसचिव यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक – 2002.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com